संशोधन आराखडा

'महाराजा सयाजीराव गायकवाड ' : एक चिकित्सक अभ्यास '

(इ.स.1875 ते इ.स.1939)

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड.

अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील ' इतिहास ' विषयातील पीएच.डी.पदवी मिळविण्यासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

श्री.ढवळे पांडुरंग लक्ष्मणराव (एम.ए.)

संशोधक विद्यार्थी स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड .

Email.pandurangdhavle1982@gmail.com

Mob . 8379089704

संधोशनकेंद्र

पानसरे महाविद्यालय,अर्जापूर ता.बिलोली

संशोधन मार्गदर्शक

प्रा.डॉ. बेंजलवार.एस.जी. (एम.ए.एम.फील,पीएच.डी.)

सहयोगी प्राध्यापकव्इतिहास विभागप्रमूख,

महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा,ता.निलंगा.जि.लातूर .

Email. Sbenjal@gmail.com

Mob . 9970075041

मार्च-2022

महाराजा सयाजीरव गायकवाड : एक चिकित्सक अभ्यास

(इ.स. १८७५ ते १९३९)

प्रस्तावना :

महाराजा सयाजीराव गायकवाड हे भारताच्या इतिहासातील झाकून राहिलेले एकसोनरी पान आहे. त्याचा ६४ वर्षाच्या प्रदीर्घकालखंड पाहताना थक्क व्हावे अशा गोष्टी दिसून येतात. आयूष्यभर लोककल्याणाचा ध्यास घेतलेला राजा. शेतकरी कुटूंबातून राजपद प्राप्त झालेल्या महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी १८७५ ते १९३९ या ६४ वर्षाच्याकारकीर्दीतसामंतशाही राजवटी परंपरेला छेद देऊन लोकतंत्रीशासन पदधतीच्या अवलंब केला.लोककल्याणकारी‘प्रज्ञावंत राजा’अशी महाराजा सयाजीराव गायकवाड यांची ओळख आहे. महाराजांनी धार्मिक सामाजिकसुधारणांचेकायदेकरून समताधिष्ठीत समाजाचा पाया रचला, जातिभेद निर्मुलनाचेकायदेकरून अस्पृश्योध्दाराच्या कामासगतीदिली,सेंद्रीयशेती,ग्रामसुधारणा, औद्योगिकीकरण, व्यापार, उद्योगातील वाढ, दळणवळणाचे जाळे, सार्वत्रिक शिक्षण आणि नैतिक शुध्द आचरणही राज्यकारभाराची सुत्रेहोती.आधुनिक भारताच्या इतिहासात बडोद्याचे संस्थान हे‘ लोकशाहीची प्रयोगशाळा’ म्हणून ओळखले जाते.

महाराजांनी प्रत्येकसंधी लोकप्रबोधनासाठी आणि आधुनिक जीवनमूल्यांची पेरणीकरण्यासाठी वापरली . विद्यार्थी, शेतकरी महिला, साहित्यिक, कलावंत, राजसेवक, संशोधक, धर्मसंस्था अशा अनेकांशीत्यांनी आपल्या व्याख्यानातून संवाद साधत असत.शिकागोची धर्मपारिषद, लंडनची मानव्यविद्यापरिषद, जपानमधला सत्कारसंमारंभ, बुध्दिस्ट असोशिएशन, संगीत परिषद, ग्रंथसंपादक मंडळ, भगवानबुध्द आणि शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे उद्घाटन असे अनेककार्यत्यांनीकेलेले आढळून येते.

महाराजा सयाजीराव गायकवाड हे आधुनिक मूल्यांवर भारतीय समाजाचे पुनर्घटनकरण्याच्या ध्येयाने प्रेरीत झालेले राजेहोते. ते नेहमी असे म्हणत“ राजेपणाहा राज्याच्या स्वामित्वावर अवलंबून नसून बुध्दीच्या प्रगल्भतेवर अवलंबून असतो. ”राज्यशास्त्र, देशोदेशीच्या राज्यघटना, इतिहास तत्वज्ञान, नितीशास्त्रव धर्म त्या विषयत त्यांना विशेष रूचीहोती. आधुनिक ज्ञानविज्ञानाचा सापेक्षी अभ्यास असलेला राजा म्हणून ओळखहोती. बौध्दीकतृष्णेतूनकूठलाही विषय मूळापासून समजावून घेण्याची त्यांना आवड होती शिकागोच्या जागतिक धर्मपरिषदेचे अध्यक्षस्थान किंवा लंडन मानव्याविद्या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषवून त्यांनी आपली‘ प्रज्ञावंत राजा’अशी स्वतंत्र ओळख निर्माण केली.

भारताच्या वैचारिक, सामाजिक व शैक्षणिक बांधणीमध्ये सयाजीराव गायकवाडांनी लक्षणीयकार्यकेलेले आहे. पितामह दादाभाई नौरोजी, न्या.गोखले, महात्मागांधी, लोकमान्य टिळक महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर या अनेकांना राजाने मदतकेली. आयूष्यभर त्यांनी प्रजाहित व समाजसेवेत आपला मोक्ष शोधला एवढेच नाहीतर स्वातंज्या लढयातली सर्व क्रांतीकारकांच्या पाठीमागे आयूष्यभर उभे राहून ब्रिटिशसत्तेशीत्यांनी हिमतीने संघर्ष केला. हा इतिहास आहे.

संपन्न भारताचे स्वप्न त्यांनी नव्या पिढीत शोधले. जातपात, धर्म, पंथ यापलिकडे मानवधर्मच महत्वाचा आहे. हे ओळखूनत्यांनी मानवधर्मावरच आपला देश बलसंपन्न होईल असे मत व्यक्त केले. त्यामूनचत्यांनी सार्वत्रिक शिक्षण, प्रशिक्षित व आरोग्यसंपन्न मनूष्यबळ आणि नैतिक शूध्द आचरण या विचारसरणीवर राज्यकारभाराची जडणघडणकेलेली आहे. यामूळे प्रस्तूतसंशोधनामध्ये महाराजा सयाजीरावांच्या कार्यातून देशाहित व समाजहितकसेसाधलेहे प्रस्तूतसंशोधनातून मांडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

संधोधनाची उद्देश : -

संशोधनाचा मूख्य उद्देश ज्ञान मिळविणे हा असूनत्यामधून महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याची माहिती मिळावी म्हणूनखालील उद्देश प्रस्तूत करावयाचे आहेत.

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याचा आढावा घेणे.
२. महाराजा सयाजीरावांच्या सामाजिक, राजकिय, धार्मिक व कृषीविषयक कार्य अभ्यासणे.
३. महाराजा सयाजीरावांच्या कार्याचासमाजहित व देशहित याचा आढवा घेणे.
४. महाराजा सयाजीरावांच्या ग्रंथालय मंडळे, व ग्रामसूधारणांचा इ. आढावा घेणे.
५. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या कलावंत ज्ञानी, विद्यार्थ्यांविषयीचे प्रोत्साहनपर केलेल्या कार्याचा आढावा घेणे.
६. देशहित व समाजहितासाठी सयाजीराव गायकवाड यांनी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.
७. भारतीय स्वातंत्र्यलढयातील योगदानाचा आढावा घेणे.

गृहीतके: -

संशोधनाची दिशा म्हणजे अज्ञात माहिती ज्ञातकरणेही असून महाराजा सयाजीराव गायकवाडांच्या जीवन कालखंडावर इ.स.१८७५ ते इ.स.१९३९ पर्यंतच्याकार्याची भूमिका संशोधनाच्या दिशेने मांडली आहेत.

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या शैक्षणिक,व सामाजिककार्याचा आढावा घेण्यात येईल.
२. महाराजा सयाजीराव यांच्या कृषीविषयक सूधारणा व ग्रामसुधारणांच्या कार्याचा आढावा घेण्यात येईल.
३. महाराजा सयाजीराव यांनीस्वातंत्र्य काळात महाराजांनी दिलेल्या योगदानाच्या आढावा घेण्यात येईल.

४. महाराजा सयाजीराव यांनीउच्च शिक्षण व शिक्षणप्रेमी लोकांना मदतकेली या कार्याचाही आढावा घेण्यात येईल.

५. महाराजा सयाजीराव यांनी‘अस्पृश्यता निवारण ’ व ‘सामाजीक समता ’ या माध्यमातूनसामाजीक अज्ञान दूरकरण्याचा आढावा घेण्यात येईल.

संशोधन पध्दती

महाराजा सयाजीराव गायकवाड: एक चिकित्सक अभ्यास हासंशोधनाचा विषय असूनतो इ.स. १८७५ ते १९३९ पर्यंतच्या ६४ वर्षाचा कालखंड आहे. महाराजा सयाजीरावांच्या स्वातंज्यपूर्व सामाजीक शैक्षणिककार्याचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच या संशोधनामध्ये महाराजाच्या सयाजीराव चरित्रग्रंथ, गौरव ग्रंथाचाहीसाधने म्हणून उपयोगकरण्यात येणार आहे. या प्रस्तुतसंशोधनासाठी बहुतांशी प्राथमिकसाधने व अंशत: दूय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे. या प्रस्तुतसंशोधनामध्ये ऐतिहासिक विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे.

प्रकरणे

१. पार्श्वभूमी : -

प्रस्तूत प्रकरणातसंशोधन विषयांच्या अनूषंगाने पार्श्वभूमी मांडली जाणार आहे. त्यामध्येभारतावर इग्रंजी राजवटी मध्ये समाज अज्ञान, अंधश्रध्दा, रूढी-परंपरेनेग्रासलेला समाज होता.कोणत्याचसूधारणांचा मागमूसही नव्हता. अशाच १९ व्या शतकातहळूहळू पाश्चिमात्य विचारप्रवाहाला (मानवतावाद, स्वातंञ्य)सुरूवात होऊ लागलीहोती. समाजसूधारकांनी ज्ञानाचा प्रसार व्हावा. बूध्दीनिष्ठ तत्वज्ञानाचा प्रसार व्हावा हया मूल्यावर आधारितसमाज निर्माण व्हावा यासाठी अनेकसमाजसुधारक पूढे सरसावू लागले. त्याच कालखंडात महाराजाचा सयाजीरावांच्याही कार्यही उल्लेखणीयठरलेले दिसून येते. म्हणून सयाजीरावांच्या महत्वपूर्ण कालखंड इतिहासातील सूवर्णपान आहे.

२. वैचारिक जडणघडण : -

प्रस्तूत प्रकरणातसंशोधन विषयांच्या अनूषंगाने वैचारिक जडणघडणमांडली जाणार आहे.त्यामध्येमहाराजा सयाजीराव गायकवाड हे नाशिक जिल्हयातील कवळाणा येथे ११ मार्च १९६३ ला जन्मलेलेगोपाळहे बडोदयाचे संस्थानधिपती झाले. प्राथमिक शिक्षण व त्यानंतर राज्यप्रशासनाचे शिक्षण पूर्णहोऊन १८८१ साली राज्यकारभार पाहू लागले.

शिक्षणही प्रगती-परिवर्तनाची जादूचीकांडी आहे. हे ओळखून पूस्तकाची नाते जोडले.अभ्यास करून मंथन करणे, टिपनेकाढणे, सार्वजनिक समारंभात बोलणे, एक बहूश्रूत वक्ता नावाने त्यांची ओळख निर्माण झाली. एक सूविध, सुस्वभावी, स्वदेशाभिमानी समाजसुधारक, आणि जनकल्याणाचा ध्यास घेतलेला लोकपाल राजा अशी सयाजीरावांची ओळख भारतातच नव्हे तर जगभर पसरली.महाराजंची भाषणे म्हणजे एका प्रज्ञावंत राजाची राज्यप्रशासनाची जणू आधुनिक राजसहितांचहोती.

३. महाराजा सयाजीरावांचे शैक्षणिककार्य : -

प्रस्तूत प्रकरणातसंशोधन विषयांच्या अनूषंगाने महाराजाचे शैक्षणिककार्य मांडली जाणार आहेत. त्यामध्येमहाराजा सयाजीरावांचा सर्वात जिव्हाळयाचा विषय शिक्षणहाचहोता. १९ व्या शतकातील आपल्या राज्यात सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षणाचा प्रयोगकरणारा प्रगमनशील राजा म्हणून जगाच्या इतिहासात त्यांच्या कर्तृत्वाची नोंद झालीत्यांनी अत्यंजासाठी शिक्षण दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उच्चशिक्षणासाठीअमेरिकेस पाठविले. महात्मा फुलेच्या सार्वजनिक सत्यधर्म हे पुस्तक लिहण्यासही मदतकेले,

त्याशिवाय मूल्यशिक्षण, शास्त्रीय शिक्षण, औद्योगिक शिक्षण, स्त्रीशिक्षण, शारीरिक शिक्षण व वस्तीगृहे उभारली अनेक माध्यमातून महाराजांनी शैक्षणिकसूधारणा घडवून आणल्या.

४. महाराजा सयाजीरावांच्या सामाजीकसूधारणा व ग्रामोध्दार : -

प्रस्तूत प्रकरणातसंशोधन विषयांच्या अनूषंगाने महाराजा सयाजीरावांच्या सामाजीकसुधारण व ग्रामउध्दारहीकार्यमांडली जाणार आहे. त्यामध्येमहाराजा सयाजीरावांनी विधवा पूर्नविवाह, बालविवाह प्रतिबंध,घटस्फोट, पूरोहितांना परवाना, मालमत्तेमध्ये विधवांचा हक्क, वेठबिगारी, शाहूमहाराजांच्या सारखे वेदोक्त प्रकरणेसहज आपल्या दरबारात हाताळली.स्त्रीजाती विषयी अनेकसुधारणा घडवून आणल्या.

भारतात गाव तेथे ग्रामपंचायत गावोगावी वाचनालये व व्यायामशाळा, धर्मखात्याची सूरूवात केली.पाणीपूरवठा योजना, कलाभूवन व हून्नर उद्योगाचे शिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास इ. ग्रामोध्दाराचेकार्य अशा सूधारणा, घडवून आणल्या.स्त्रीशिक्षणातून राणीला स्वत: शिकविण्यात सूरूवात केले.साहित्य, कला, शिल्पकला, संगीत या कलांचा विकास घडवून आणला.

५. महाराजा सयाजीरावांचे कृषीविषयक कार्य : -

प्रस्तूत प्रकरणातसंशोधन विषयांच्या अनूषंगाने सयाजीरावांचे कृषीविषयक कार्य मांडली जाणार आहेत. त्यामध्येमहाराजांनी शेती विकासाला महत्त्वाचे मानून पिण्याचे पाणी व शेतीसाठी सिंचनव्यवस्था हे सयाजीरावांच्या विकासनीतीतले अग्रक्रमाचे विषय होते १८८६ ते १९३० पर्यंत बारा हजाराहून आधिक विहीरी खोदल्या, पाटबंधाऱ्यातलेकामे, धरणे बांधणे, कालवे काढणे अशा नवीन उपक्रमांना उत्तेजन देऊन अर्थव्यवस्था गतिशील ठेवण्याची त्यांची भूमिका होती. शेतीचे अर्थशास्त्र हा त्यांचा चितंनाचा विषय होता. शेतीवर उपजिविका करणाऱ्या कामगार वर्गाला ४ महिनेकाम व ८ महिने रिकामेपण या वरमात करून शेतीला पूरक जोडव्यवसाय, नवे उद्योगधंदे किंवा शेतीला पोषक पोटधंदेखेडया पाडयातूनसूरूकेल्याने ग्रामविकासावर भर पडली“ भारतातील शेतकरी व मजूर यांची आर्थिकक्रयशक्ती वाढल्या शिवाय हिंदूस्थानाची औद्योगिक प्रगतीहोणार नाही. असेठाम मत होते.”

म्हणूनमहाराजांनीसहकारी चळवळीचा विस्तार घडवून आणला.

६. स्वातंत्र्यलढयाविषयी महाराज सयाजीरावांची भूमिका : -

प्रस्तूत प्रकरणातसंशोधन विषयांच्या अनूषंगाने स्वातंत्र्यलढयातील भुमिका मांडली जाणार आहे. त्यामध्येमहाराजांनी पितामह दादाभाई नौरोजी ना.गोखले, महात्मागांधी, लोकमान्य टिळक, महात्मा फुले , छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्यवीर सावरकर अनेकांना मदतकेली.

विलायतेतील क्रांतीकारकांना महाराजांनीमदतकेलीक्रांतीकारकाची आश्रयस्थान ; नर्मदाकाठांध गंगानाथ राष्ट्रीयविद्यालय हेक्रांतीकारकाचेकेंद्रस्थानहोते. अहमदा बॉम्ब प्रकरणात बडोदा मंडळीचाहातहोता. असे अनेक देशचळवळीस पाठिबा दिला. तसेच देशासाठी ज्ञानप्रसार केवळ मूळभर लोकांनी नव्हे हेसांगितले, स्वातंत्र्य, समता व बंधूता हीकल्पना महाराजांचीहोती. हासंशोधनातून अभ्यास केला जाणार आहे.

७. निष्कर्ष : -

महाराजा सयाजीरावांनी आपल्या संपूर्ण ६४ वर्षाच्या कारकीर्दीत शैक्षणिक चळवळ उभी केली त्यामध्ये शाळा, महाविद्यालये, वस्तीगृहे काढलीसामाजीक व कृषीविषयक सूधारणा घडवून आणल्या, देशाच्या स्वातंत्र्यासाठी महाराजा सयाजीरावांचे योगदानखूप मोलाचे आहे. त्यामधून ब्रिटीश सत्तेशी नेहमी संघर्ष करून देशहित जपले म्हणून महाराजा सयाजीरावांनी असेकार्यकेलेले दिसून येणार आहे. म्हणूनतो एक युगदृष्टा म्हणून महाराजाची ओळख आहे.

●संदर्भ ग्रंथ : -

जाणता राजा महाराजा सयाजीराव गायकवाड

१. आपटेदा.ना, - श्री महाराजा सयाजीराव गायकवाड खंड, १,२,३ - कर्नाटक पब्लिशिंग हाऊस बॉम्बे.

२. डॉ. वरखेडे रमेश (संपा),महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा भाषण संग्रह भाग, १,२, - २०१४

३. डॉ. पगार एकनाथ(संपा) ,महाराजा सयाजीराव गायकवाड यांचा पत्रसंग्रह .१,२,३. महा. शासन -२०१७.

४. भांड बाबा (संपा), महाराजा सयाजीराव गायकवाड गौरवगाथा युगपूरूषाची -खंड १२ - महा. शासन -२०१७

५. काळेवामन(संपा), बडोदा राज्याची सांपत्तिकतस्थिती’श्रीसयाजी गौरव ग्रंथ भाग-१ वाढदिवसमंडळ बडोदे (१९३३)

६. तळवटकर गोविंद, सत्तातंर : १९४७ खंड १,मुंबई मौजप्रकाशन मुंबई, -१९९७.

७. राजवाडे वि .का ;‘ बडोदयातील सूधारणा समग्र राजवाडे साहित्यखंड ८,-१९९८.

८. ‘जनता’ वृत्तपत्रातील लेख -१९३९.

९. माटेश्री. म. - अस्पृश्यांचा प्रश्न - पूणे प्रकाशक, -१९३३.

१०. मोरेसदानंद - लोकमान्यते महात्माखंड - १ राजहंस प्रकाशन पूणे,२००७.